# घटक क्र १ ⇒ मुलभूत संकल्पना

## अर्थव्यवस्था म्हणजे काय?

⇒ उत्पादन, विभाजन, विनिमय आणि उपभोग या चार प्रकारच्या व्यवहारांना आर्थिक व्यवहार म्हणतात.

⇒ या चार व्यवहाराच्या संबंधित असलेल्या संस्था, संघटना यांच्या एकत्रिकरणातून जी व्यवस्था निर्माण होते तिला अर्थव्यवस्था म्हणतात.

⇒ ॲडम स्मिथ या अर्थशास्त्रज्ञास अर्थशास्त्राचा पितामह म्हणून ओळखले जाते. -१८ वे शतक स्कॉटिश असलेल्या स्मिथने 'वेल्थ ऑफ नेशन्स' हा अर्थशास्त्राचा जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. औद्योगिक क्रांती व भांडवलशाहीतील बाजारपेठेची समिकरणे यात मांडली. त्याने मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. त्यांचे धोरण व्यापारवादाच्या विरुद्ध होते. "बाजारपेठेतील घटकांवर कुठलेही नियंत्रण ठेवू नये, या घटकांवर बाजारच स्वतः नियंत्रण ठेवत असतो, बाजाराला स्वतः चा एक अदृश्य हात असतो. असा सिद्धांत मांडला.

## अर्थव्यवस्थांचे प्रकार:

उत्पादक साधनाच्या मालकीनुसार:
- → भांडवलशाही
- → समाजवादी
- → मिश्र.

विकासाच्या अवस्थेनुसार -
- → विकसित
- → विकसनशील.

उत्पादक साधनांच्या मालकीनुसार: भूमी, श्रम, भांडवल व उद्योजकता ही उत्पादनाची साधने त्याच्या मालकीवरून

**भांडवलशाही अर्थव्यवस्था:**
- * उत्पादनाची साधने खाजगी मालकीची
- * वस्तू व सेवांचे उत्पादन खाजगी भांडवलदारामार्फत
- * किंमती बाजारयंत्रणे करवी ठरतात.

वैशिष्ट्ये ⇒
- i) खाजगी मालकी हक्क - निर्णय मालक
- ii) ग्राहक सार्वभौम - कारण ग्राहकाच्या पसंतीनुसार उत्पादन
- iii) बाजारपेठेत स्पर्धा
- iv) किंमत मुक्तपणे ठरते - सरकारी हस्तक्षेपापासून दूर म्हणून या व्यवस्थेला मुक्त अर्थव्यवस्था म्हणजेच हस्तक्षेपविरहीत अर्थव्यवस्था म्हणतात.
- v) बाजार अर्थव्यवस्था असे म्हणतात कारण वस्तू व सेवांच्या किंमती बाजारात मागणी व पुरवठ्याच्या आधारे ठरतात.
- vi) नफा मिळविण्याच्या उद्देशाने उत्पादन
- vii) उद्योजकता व संयोजन कौशल्याला पूर्ण वाव.

Scanned by CamScanner

दोष ⇒ i) आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण : आर्थिक व सांपत्तिक विषमता वाढते.

ii) अधिकाधिक नफा हे उद्दिष्ट असल्याने गरिबी, बेरोजगारी, कामगार कल्याण व पर्यावरण याकडे दुर्लक्ष.

iii) चैनीच्या वस्तू उत्पादनावर अधिक भर

iv) तेजी मंदीची व्यापार चक्रे येतात - तेजी - किंमतवाढ, मंदी - बेरोजगार वाढ.

## * समाजवादी अर्थव्यवस्था :

⇒ उत्पादनाची साधने सरकारी / सार्वजनिक मालकीची.

→ वस्तू / सेवांचे उत्पादन सरकारमार्फत

वैशिष्ट्ये : i) साधनसामग्रीचा वापर समाजहितासाठी

ii) उत्पादन, उद्योग सुरू करणे, किंमती, विक्रीव्यवस्था - सरकारमार्फत.

iii) उत्पादन वैयक्तिक नफ्यासाठी नाही.

iv) मूलभूत गरजेच्या वस्तू व सेवा योग्य किंमतीत व योग्य प्रमाणात लोकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न.

v) खाजगी भांडवलाला वाव नाही - आर्थिक व सांपत्तिक विषमता कमी करण्यावर भर. - सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे प्रमुख उद्दिष्ट.

vi) उत्पादन, वाटप, किंमती इ. बाबी बाजारयंत्रणेवर अवलंबून नसल्याने ग्राहक सार्वभौम रहत नाही.

दोष : ⇒ i) व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप.

ii) राज्यकर्त्यांची हुकुमशाही - सरकारी नियंत्रणाचा अतिरेक होण्याची शक्यता.

iii) संसाधनाचा अपव्यय होण्याची शक्यता.

iv) कार्यक्षमता व उत्पादकता कमी होते.

⇒ या अर्थव्यवस्थेलाच आदेशात्मक अर्थव्यवस्था किंवा नियोजीत अर्थव्यवस्था म्हणतात.

या अर्थव्यवस्थेचे दोन उपप्रकार.

① आदेशात्मक नियोजन : - अतिनियोजित व अतिकेंद्रित स्वरूप :

② सूचकात्मक नियोजन - थोडे ढिले स्वरूप - यामध्ये नियोजन लक्ष्य व अग्रक्रमाचा आराखडा बनवला जातो परंतु ते प्राप्त करण्यासाठी आदेश न देता सुचविले जाते. ग्राहकांचे निवडस्वातंत्र्य आणि उत्पादकाचे उत्पादनस्वातंत्र्य या प्रकारात राखले जाते.

## * मिश्र अर्थव्यवस्था

⇒ भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही अर्थप्रणालीमधील दोष टाळून चांगल्या गुणांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या अर्थव्यवस्थेला मिश्र अर्थव्यवस्था म्हणतात.

⇒ उत्पादन कार्य सरकार तसेच खाजगी क्षेत्रामार्फत.

⇒ भारताने स्वातंत्र्यानंतर मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.

⇒ १९९१ नंतर हा प्रवास मुक्त अर्थव्यवस्थेकडे.

Scanned by CamScanner

17. * कोणत्या देशात कोणती अर्थव्यवस्था हे ठरविण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य निर्देशांक - IEF- Index of Economic freedom - मोजला जातो.

⇒ अमेरिकेच्या हेरिटेज फाउंडेशन आणि वॉल स्ट्रीट जर्नल यांनी 1995 मध्ये IEF विकसित केला. 186 देशांचा 12 आयाम आधारित - निर्देशांक - दरवर्षी हे 12 आयाम 4 घटकांमध्ये विभागले गेले आहेत - 1) कायदयाचे राज्य 2) शासन आकार 3) नियमन कार्यक्षमता 4) खुला बाजार

⇒ 2017 - चा अहवाल - हाँगकाँग 89.8 - भांडवलशाही
उ. कोरीया 4.9 - समाजवादी / आदेशात्मक
भारत 52.6 - मिश्र अर्थव्यवस्था - 143 वा क्रमांक.

⇒ स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात भांडवलशाही / बाजार अर्थव्यवस्था.

⇒ स्वातंत्र्यानंतर 8 एप्रिल 1948 ला भारतात पहिले औद्योगिक धोरण :- मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार

⇒ 28 मार्च 1950 ला नियोजन आयोग स्थापन

⇒ 1 एप्रिल 1950 - पहिली पंचवार्षिक योजना.

⇒ 30 एप्रिल 1956 ला दुसरे औद्योगिक धोरण :- (आदेशात्मक नियोजनाकडे झुकाव)

⇒ 1991 साली भारत आर्थिक संकटात - उदारिकरणाचे वाटे - आर्थिक संरचनात्मक सुधारणांचे युग सुरु झाले ⇒ म्हणजेच -
i) अर्थव्यवस्थेला अधिक स्वातंत्र्य देणे.
ii) अर्थव्यवस्थेवरील बंधने शिथिल करणे.
iii) खाजगी क्षेत्र विस्ताराला वाव देणे
iv) परकीय क्षेत्र खुले करणे.

⇒ 24 जुलै 1991 - नविन औद्योगिक धोरण जाहीर :- आदेशात्मक नियोजनाकडून सूचकात्मक नियोजनाकडे → त्यामुळे बाजार अर्थव्यवस्थेकडे प्रवास.
1995 मध्ये IEF = 45.1 — 2017 मध्ये 52.6

अर्थव्यवस्थेचे स्थित्यंतर:

स्वातंत्र्यपूर्व काळ → भांडवलशाही
पहिले औद्योगिक धोरण - 1948 → मिश्र अर्थव्यवस्था
दुसरे औद्योगिक धोरण 1956 → आदेशात्मक नियोजन (समाजवादी)
1991 चे औद्योगिक धोरण → भांडवलशाही / मुक्त बाजारव्यवस्था.

भांडवलशाही → मिश्र अर्थव्यवस्था → आदेशात्मक नियोजन (समाजवादी) → भांडवलशाही / मुक्त बाजारव्यवस्था.

⇒ 1991 ते 1915 अर्थव्यवस्था - धड बाजार अवस्थेत प्रवेश नाही व धड आदेशात्मक मधून बाहेर पडली नाही.
2015-16 च्या भारतीय आर्थिक पाहणी अहवालात या स्थितीस चक्रव्यूह आव्हान म्हटले आहे.

विकासाच्या अवस्थेनुसार: अर्थव्यवस्थेचा विकास किती प्रमाणात झाला आहे त्यानुसार

* विकसित अर्थव्यवस्था ; लक्षणे
⇒ दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाचे मोठे प्रमाण
⇒ मोठ्या प्रमाणातील औद्योगिकरण व शहरीकरण
⇒ साक्षरतेचे उच्च प्रमाण
⇒ घटता जन्मदर व मृत्यूदर

Scanned by CamScanner

उदा. यु.एस.ए, यु.के, जर्मनी, फ्रान्स, जपान, ऑस्ट्रेलिया :

२) **विकसनशील अर्थव्यवस्था :** लक्षणे .

⇒ विकासाच्या मार्गावर.
⇒ अल्प दरडोई उत्पन्न
⇒ कमी औद्योगिकीकरण
⇒ साक्षरतेचे कमी प्रमाण
⇒ लोकसंख्या वाढीचा उच्च दर.

## उत्पादनाची साधने .

| १) भूमी : | २) श्रम . | ३) भांडवल . | ४) उद्योजकता / संयोजक . |
| --- | --- | --- | --- |
| १) विनामूल्य घटक | १) सक्रिय घटक | १) मानवनिर्मित | १) कार्यक्षम |
| २) उदासिन - | २) अंगभूत घटक | २) गतिशिल | २) संघटक |
| ३) गतिक्षमता नाही (भौगोलिक) | ३) श्रमिक श्रम विकतो स्वतः नाही. | ३) उदासिन | ३) नेतृत्वक्षमता |
| ४) अलवचिक पुरवठा. | ४) मर्यादित गतिशिलता. | ४) लवचिक पुरवठा | ४) निर्णयक्षमता |
| ५) व्यावसायिक गतिक्षमता | ५) नाशवंत घटक | ५) अप्रत्यक्ष मागणी. | ५) आत्मविश्वास |
| ६) शाश्वत, अविनाशी | ६) पुरवठा अलवचिक | ६) संपत्तीचा भाग | ६) धैर्य व साहस |
| ७) गुणभिन्नता | ७) श्रमिकांची कार्यक्षमता. | ७) टिकाऊपणा | ७) ज्ञानी |
| ८) अप्रत्यक्ष मागणी. | ८) कमी सौदाशक्ती. | ८) उत्पादक घटक | ८) नवप्रवर्तक |
| ९) स्थानापरत्वे महत्व. | | | ९) दूरदृष्टी . |

* भांडवल ⟶ उत्पादित उत्पादनाची साधने म्हणजे भांडवल होय. भांडवली वस्तू जे उत्पन्न मिळवून देते.

भांडवलाचे प्रकार :

① **मालकी हक्कानुसार** — ① **खाजगी** :- व्यक्तीचे किंवा संस्थेच्या मालकीचे : उदा. कारखाना, यंत्र
② **सार्वजनिक** :- समाजाच्या किंवा सरकारच्या मालकीचे. शाळा, रेल्वे.

② **टिकाऊपणानुसार** : ① **स्थिर** :- जो उत्पादन प्रक्रियेत पुन्हा पुन्हा वापरण्यात येते; टिकाऊ - इमारत.
② **खेळते** :- एकदाच वापरता येते - बदलते - कच्चा माल, पेट्रोल इ.

③ **अतिमानतेनुसार** :- ① **विशिष्ट उपयोगी** : विशिष्ट कार्यासाठी : वॉशिंग मशीन, झेरॉक्स मशीन .
② **विविध उपयोगी (तरते)** : अनेक कार्यासाठी : बीज, इंधन.

④ **स्वरूपानुसार** : ① **वास्तव** : भौतिक स्वरूपातील - उदा. यंत्र सामग्री, कच्चा माल इ.
② **पैशाच्या स्वरूपातील** : या साह्याने वास्तव भांडवल खरेदी करता येते.

## * अर्थव्यवस्थेची क्षेत्रे :

१) व्यवसायानुसार २) मालकीनुसार.

...नुसा
① प्रा...

Scanned by CamScanner

## ...यानुसार :

① **प्राथमिक क्षेत्र** : * नैसर्गिक साधनसामग्रीशी संबंधित कृषी व संलग्न व्यवसाय.
* पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उत्पादन )
* जंगलसंपत्ती, खाणी व खनिज उत्पादने.
* कृषी व संलग्न क्षेत्र असेही संबोधतात.

② **द्वितीयक क्षेत्र** : ⇒ प्राथमिक क्षेत्रातून प्राप्त वस्तूंवर प्रक्रिया करून दुसऱ्या वस्तू तयार केल्या जातात म्हणून या क्षेत्रास उद्योगक्षेत्र असेही संबोधतात.
* अन्नधान्य व त्यावरील प्रक्रिया उद्योग, शीतपेये, दारू, कापड, बूट, वस्त्र, बॅग, फर्निचर, कागद, छपाई, खते, रसायने, औषधे, टायर, ट्यूब, प्लॅस्टिक, काच, लोहपोलाद, धातू, संगणक, मशिनरी, उपकरणे, मोटारी, रेल्वे, जहाज, विमान, दागिने इ.

③ **तृतीयक क्षेत्र** - ⇒ प्राथ. व द्वितीयक व्यवसायांना पूरक असणाऱ्या सेवांचा समावेश.
* व्यापार, वाहतूक, दळणवळण इ.
* सेवाक्षेत्राचे वर्गीकरण 4 गटामध्ये.

सेवा क्षेत्र :
1) वितरण ⇒ वस्तू वाहतूक, मानवी वाहतूक, दळणवळण, घाऊक किरकोळ व्यापार, बातम्या, मिडिया, इ.
2) व्यावसायिक ⇒ वित्तीय, विमा, कायदा, लेखे, माहिती-तंत्रज्ञान, रिअल इस्टेट इ.
3) ग्राहक सेवा ⇒ आरोग्य, शिक्षण, हॉटेल, करमणूक, पर्यटन इ.
4) ना-नफा सेवा ⇒ लोकप्रशासन, संरक्षण, संघटना, युनियन, मंदिरे लोकसेवा इ.

④ **चतुर्थक क्षेत्र** ⇒ उच्च बौद्धिक क्षमतेचा वापर ज्या व्यवसायामध्ये करण्यात येतो.
उच्च ज्ञानाशी संबंधित ⇒ संकल्पनांची निर्मिती, संशोधन व विकास.
* माहिती व्यवस्थापन, मार्गदर्शन, संख्याशास्त्र, संशोधन, विकास, माहिती इ.

⑤ **पंचम क्षेत्र** ⇒ समाजातील व अर्थव्यवस्थेतील सर्वोच्च स्तरावरील निर्णय प्रक्रियेचा समावेश.
* सरकार, विज्ञान, विद्यापीठे, इ. क्षेत्रातील उच्च स्तरीय कार्यकारी संचालक/अधिकारी.

## क्लार्क प्रतिमान

— कोलीन क्लार्क :
⇒ विविध आर्थिक विकासाच्या अवस्थेचे टप्पे दाखवणारे प्रतिमान.

पहिला टप्पा ⇒ **प्राथमिक अवस्था** - सुरूवातीला कृषी आधारीत अर्थव्यवस्था, रोजगारनिर्मितीत कृषी क्षेत्राचा वाटा सर्वाधिक

दुसरा टप्पा ⇒ **द्वितीय अवस्था** - उद्योगक्षेत्राचा विकास, अर्थव्यवस्था औद्योगिक अर्थव्यवस्था बनते.

तिसरा टप्पा ⇒ **तृतीय अवस्था** - कृषी क्षेत्राचा वाटा झपाट्याने कमी होतो, उद्योग क्षेत्राचा वाटा स्थिर राहतो. सेवा क्षेत्राचा वाटा तीव्र गतीने वाढतो.

Scanned by CamScanner

⇒ भारतात राष्ट्रीय उत्पन्न मोजणे व संबंधित आकडे प्रकाशित करण्याचे काम CSO (Cent...

⇒ राष्ट्रीय उत्पन्नाचा विविध क्षेत्रातील वाटा ठरवते.

GDP – 2016नुसार- भारतात कृषी क्षेत्राचा वाटा १६.५%.
उद्योग क्षेत्राचा वाटा २३.८%.
सेवा क्षेत्राचा वाटा ५५.४%.

1950-51 मध्ये हाच वाटा अनुक्रमे ५५.३%, १६.२% व २९.५% होता.

## * मालकीनुसार क्षेत्र :

① **सार्वजनिक** : सार्वजनिक मालकी (सरकारी), व्यवस्थापन व नियंत्रणाखाली असलेल्या सर्व उद्योग उपक्रमांचा समावेश उदा रेल्वे, शस्त्रास्त्रे, दूरदर्शन, पेट्रोलियम

② **खाजगी** : खाजगी व्यक्ती किंवा व्यक्तिसमूहाची मालकी असलेले.
कृषी व पूरक उद्योग, लघुउद्योग, घाऊक व किरकोळ व्यापार.

③ **संयुक्त** : सरकार व खाजगी व्यक्ती किंवा व्यक्तिसमूहाची संयुक्त मालकी.

④ **सहकारी** : सहकारी तत्त्वावर स्थापन करण्यात आलेल्या संस्था/उद्योगांचा समावेश
खाजगी क्षेत्राचा एक उपप्रकार.- कारण मालकी खाजगीच पण व्यक्ती ऐवजी समूहाची असते.
भांडवलशाही व समाजवाद या दोन अर्थव्यवस्थांचा सुवर्णमध्य
सभासदाचे भांडवल कितीही असले तरी एक सभासद एक मत हे तत्व -

## विकास अवस्थानुसार देशांचे वर्गीकरण : १) अविकसित २) विकसनशील ३) विकसित.

① **संयुक्त राष्ट्रसंघाच्या UNDP ने देशांचे वर्गीकरण.**

हे वर्गीकरण मानव विकास निर्देशांकाच्या आधारे.

| | | |
|---|---|---|
| ① | अतिउच्च विकसित | – 0.800 |
| ② | उच्च विकसित | – 0.700 ते 0.799 |
| ③ | मध्यम विकसित | – 0.550 ते 0.699 |
| ④ | अल्प विकसित : | – 0.550 पेक्षा कमी. |

② **संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक बँकेने**

दरडोई उत्पन्नावर आधारित

| | | |
|---|---|---|
| ① | उच्च उत्पन्न देश | – GNI-12476$ PC |
| ② | उच्च मध्यम उत्पन्न देश | 4036$ ते 12475$ |
| ③ | कमी मध्यम उत्पन्न देश | 1026$ ते 4035$ |
| ④ | अल्प उत्पन्न देश. | 1025$ पेक्षा कमी. |

③ **WTO ने : - स्वयंघोषित** – ① विकसित
② विकसनशील
③ अल्पविकसित

Scanned by CamScanner